प्रशासकीय अधिकारी, आ. रा. से. गट - ब आयुर्वेद संचालनालय
प्रशासकीय अधिकारी आ. रा. से गट - ब, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय
चाळणी परीक्षा

**प्रश्नपुस्तिका क्रमांक** 2016 Code : **K07**

**BOOKLET No.**

# A

## प्रश्नपुस्तिका
## चाळणी परीक्षा

**एकूण प्रश्न : 50**

**वेळ : 1 (एक) तास** **एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **50** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. आणि तसेच इतर काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृति करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनाधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. मराठयांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी खालीलपैकी कोणत्या समाजसुधारकाने केली होती ?
   (1) महात्मा फुले (2) शाहु महाराज
   (3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (4) यापैकी कोणीही नाही

2. श्री शिवाजी लोकविद्यापीठाची अभिनव व सर्वांगपूर्ण योजना कोणी कार्यान्वित केली होती ?
   (1) कर्मवीर भाऊराव पाटील (2) डॉ. पंजाबराव देशमुख
   (3) डॉ. राजेंद्र प्रसाद (4) डॉ. आंबेडकर

3. राष्ट्रीय महामार्ग क्र. 13 खालीलपैकी कोणत्या दोन शहरांना जोडतो ?
   (1) धुळे – कोलकत्ता (2) पनवेल – मंगळूर
   (3) सोलापूर – चित्रदुर्ग (4) जबलपूर – हैद्राबाद

4. खाली नमूद केलेल्या जिल्हयांची व त्यामधील सरोवरे (तलाव/जलाशय) यांच्या योग्य जोड्या लावा.

| *जिल्हा* | | *सरोवर (तलाव / जलाशय)* | |
|---|---|---|---|
| अ. | चंद्रपूर | I. | बोदलकसा |
| ब. | गोंदिया | II. | यशवंत तलाव |
| क. | नागपूर | III. | चोखमारा |
| ड. | भंडारा | IV. | असोला मेंढा |
| | | V. | रामसागर |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | V | II | IV |
| (2) | V | II | IV | III |
| (3) | III | IV | V | II |
| (4) | IV | I | V | III |

5. पुढील विधानांचा विचार करा :
   अ. माहिती अधिकाराचा कायदा 2005, संमत झाल्यानंतर अपवाद न ठेवता सर्व भारतभर लागू झाला.
   ब. माहिती अधिकाराचा कायदा 2005, संमत झाल्यानंतर सर्व तरतुदी ताबडतोब लागू झाल्या.
   पुढीलपैकी योग्य उत्तर निवडा :
   (1) अ बरोबर ब चूक (2) अ चूक ब बरोबर
   (3) अ आणि ब दोन्ही बरोबर (4) अ आणि ब दोन्ही चूक

6. माहिती मिळविण्यासाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित माहिती अधिकारी किती मुदतीत अर्ज निकालात काढेल ?
   (1) 30 दिवस (2) 60 दिवस
   (3) 90 दिवस (4) 48 तास

7. घटकराज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाल्यास, दर ____________ महिन्यानंतर संसदेची मान्यता घेवून राष्ट्रपती राजवटीचा कमाल कालावधी ____________ वर्षांपर्यंत वाढविता येतो.

(1) 3, 3 (2) 6, 5

(3) 3, 5 (4) 6, 3

---

8. भारतीय संविधान पूर्ण करण्यास ____________ एवढा कालावधी लागला.

(1) 2 वर्ष 11 महिने 11 दिवस

(2) 2 वर्ष 11 महिने 28 दिवस

(3) 2 वर्ष 11 महिने 18 दिवस

(4) 3 वर्ष 11 महिने 18 दिवस

---

9. 4जी वायरलेस भ्रमणध्वनी सेवा (4G wireless mobile service) कोणत्या तंत्रज्ञानावर अवलंबून आहे ?

(1) कोड डिवीजन मल्टीपल ॲक्सेस (सी.डी.एम.ए.)

(2) टाईम डिवीजन मल्टीपल ॲक्सेस (टी.डी.एम.ए.)

(3) इंटरनेट प्रोटोकॉल (आय.पी.)

(4) फ्रिक्वेन्सी डिवीजन मल्टीपल ॲक्सेस (एफ.डी.एम.ए.)

---

10. इंटरनेट फायवॉल काय करते ?

(1) संगणकाचा आगीपासून बचाव करते

(2) संगणकाला अनपेक्षित धोक्यापासुन (attacks) पासून वाचवते

(3) इंटरनेटचा आगीपासून बचाव करते

(4) वरील सर्व पर्याय

---

11. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने कोणत्या दिवशी "मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा" संमत व स्वीकृत केला ?

(1) 21 नोव्हेंबर 1947

(2) 25 जून 1945

(3) 10 डिसेंबर 1948

(4) वरीलपैकी कोणत्याही नाही

---

12. मानवी हक्क आयोगाच्या अध्यक्षाला राजीनामा द्यायचा असल्यास तो कोणास द्यावा लागेल ?

(1) भारताचे सर न्यायाधीश

(2) राष्ट्रपती

(3) विरोधी पक्ष नेते

(4) पंतप्रधान

---


13. 2015 सालचा 'मॅन बुकर' पुरस्कार कोणत्या लेखकाला मिळाला आहे ?
   (1) संजीव सहोता
   (2) टॉम मॅकार्थी
   (3) मार्लोन जेम्स
   (4) ॲनी टेलर

14. खालील विधाने विचारात घ्या :
   अ. नुकताच फॉक्सकॉन कंपनीने आगामी पाच वर्षात महाराष्ट्रात 35 हजार कोटींची गुंतवणूक करण्या संबंधी करार केला आहे.
   ब. या करारामुळे सुमारे 50 हजार लोकांना रोजगाराची संधी निर्माण होणार आहे.
   क. फॉक्सकॉन ही दक्षिण कोरिया स्थित कंपनी आहे.
   ड. कंपनीचे अध्यक्ष टेरी गॉऊ आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.
   (1) विधाने अ, ब आणि क बरोबर
   (2) विधाने ब, क आणि ड बरोबर
   (3) विधाने अ आणि ब बरोबर
   (4) विधाने अ, ब आणि ड बरोबर

15. 2015 जागतिक फॉर्म्युला वन मालिकेतील जपानी ग्रांप्री शर्यतीचा विजेता कोण ?
   (1) लुईस हॅमिल्टन
   (2) निको रॉस्बर्ग
   (3) सेबॅस्टियन व्हेटेल
   (4) निको हुल्केनबर्ग

16. पुढीलपैकी कोणता/कोणते लेखक साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झालेले *नाहीत* ?
   अ. अशोक केळकर
   ब. माणिक गोडघाटे 'ग्रेस'
   क. जयंत पवार
   ड. सतीश काळसेकर
   इ. जयंत नारळीकर
   (1) फक्त अ आणि इ
   (2) फक्त अ
   (3) फक्त इ
   (4) वरीलपैकी एकही नाही

**17.** सोबतच्या आकृतीत वर्तुळ 'A' वृद्ध लोकांचे प्रतिनिधित्व करते. वर्तुळ 'B' महिलांचे प्रतिनिधित्व करते. त्रिकोण 'C' बलवान असणाऱ्या लोकांचे प्रतिनिधित्व करतो.




वृद्ध नसणाऱ्या बलवान महिला किती आहेत ?

(1) 3 (2) 5 (3) 9 (4) 8

---

**18.** ⛤ च्या जागी कोणता अंक येईल ?

| | | |
|---|---|---|
| 6 | 11 | 9 |
| 400 | 200 | 800 |
| 10 | 5 | 7 |
| 460 | 255 | ⛤ |

(1) 860 (2) 863 (3) 855 (4) 851

---

**19.** ⛤ च्या जागी कोणता अंक येईल ?

| | | |
|---|---|---|
| A 9 | I 17 | E 13 |
| G 15 | M 21 | ⛤ |
| K 19 | O 23 | C 11 |

(1) P 27 (2) P 25 (3) Q 25 (4) N 25

---

**20.** पर्यायातील कोणत्या संख्येचा संबंध सोबतच्या संख्या चौकटीशी आहे ?

| | | |
|---|---|---|
| 12 | 14 | 76 |
| 63 | 30 | 143 |
| 44 | 40 | 134 |

(1) 4 (2) 3 (3) 75 (4) 50

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**21.** निर्वाहभत्ता म्हणजे, ज्याला वेतन किंवा रजावेतन मिळत नाही अशा कर्मचाऱ्याला दिली जाणारी ________ रक्कम.

(1) ठोक (2) मानधन (3) विशेष (4) मासिक

---

**22.** म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम ____________ नुसार शासन आदेशाद्वारे विहित करील अशा नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्याला भ.नि.नि., विमा योजना किंवा इतर तत्सम निधित किंवा योजनेत वर्गणी भरावी लागेल.

(1) 33 (2) 39 (3) 32 (4) 34

---

**23.** म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम-9(14) कर्तव्यामध्ये – पुढील बाबी समाविष्ट असतील.

(1) परिवीक्षाधीन म्हणून केलेली सेवा

(2) पदग्रहण अवधी व शासनाच्या आदेशाद्वारे किंवा त्याअन्वये प्राधिकृत केलेळी निदेशन पाठ्यक्रम अथवा प्रशिक्षण पाठ्यक्रम

(3) वरील 1 व 2 दोन्हीही पर्याय

(4) वरीलपैकी नाही

---

**24.** म.ना.से. (वेतन) नियम 1981 च्या तरतुदीनुसार "धारणाधिकार" म्हणजे

(1) विशेष काम करण्याचा अधिकार

(2) नवीन पदावर रुजू होण्याचा अधिकार

(3) सावधि-नियुक्ती पदासह ज्या स्थायी पदावर शासकीय कर्मचाऱ्याची कायमपणे नियुक्ती केलेली असेल असे स्थायी पद कायमपणे धारण करण्याचा हक्क

(4) कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याचा अधिकार

---

**25.** म.ना.से. (वेतन) नियम 1981 मधील नियम 7 नुसार वित्त विभागाचे काही अधिकार प्रत्यायोजित करण्यात (परिशिष्ट 1 मध्ये नमूद) आले आहेत. त्यानुसार "15 दिवसापर्यंत सक्तीच्या प्रतीक्षेचा कालावधी 'कर्तव्य' म्हणून नियमित करण्याचा अधिकार" कोणाला प्रत्यायोजित करण्यात आला आहे ?

(1) मंत्रालयीन प्रशासनिक विभाग (2) कार्यालय प्रमुख

(3) प्रादेशिक विभाग प्रमुख (4) मंत्रालयीन अवर सचिव

---

**26.** म.ना.से. (वेतन) नियमांतील तरतुदींनुसार एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याला शिक्षा म्हणून त्यास समयश्रेणीतील खालच्या टप्प्यावर आणण्याचा आदेश रद्द ठरविण्यात आला असेल त्या बाबतीत

(1) खालच्या टप्प्यावर निश्चित करण्यात आलेले वेतन देण्यात येईल

(2) वेतन सुधारित करून निश्चित करण्याची गरज रहाणार नाही

(3) जर तो आदेश काढण्यात आला नसता तर जे वेतन मिळण्यास तो हक्कदार झाला असता असे वेतन व फरकाची (त्या कालावधीची रक्कम) देण्यात येईल

(4) वरीलपैकी काहीही नाही

---

**27.** म.ना.से. (पदग्रहण अवधी) नियम 1981 मधील नियमांच्या तरतुदींनुसार रजेवर असताना शासकीय कर्मचाऱ्याची परकीय सेवेत बदली झाली असल्यास, ___________ . (वाक्य पूर्ण करा)

(1) रजा संपेपर्यंत शासकीय कर्मचाऱ्यास मूळ नियोक्त्याकडून रजावेतन मिळेल

(2) बदलीच्या तारखेपासून शासकीय कर्मचाऱ्याने परकीय सेवेत रुजू व्हावे

(3) शासकीय कर्मचाऱ्याने उर्वरित रजा रद्द करावी

(4) बदलीच्या तारखेपासून शासकीय कर्मचारी रजेवर नाही असे मानले जाईल आणि मूळ नियोक्त्याकडून त्याला रजावेतन मिळणे बंद होईल

---

**28.** निलंबनानंतर शासकीय कर्मचाऱ्यास पुन्हा सेवेत घेणे, वेतन व भत्ते इत्यादि बाबत आणि त्याच्या अनुपस्थितीचा कालावधी कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून मानणे इ. बाबत म.ना.से. (पदग्रहण कालावधी, परकीय सेवा आणि निलंबन) नियम 1981 मधील नियम ___________ नुसार सक्षम प्राधिकारी निर्णय घेवू शकतात.

(1) 68 (2) 70 (3) 72 (4) 71

---

**29.** शासनाच्या एका कार्यालयातील कार्यरत 20 कर्मचाऱ्यांपैकी 10 कर्मचाऱ्यांनी एकाच कालावधिच्या रजेची मागणी करणारे अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे सादर केले असता कार्यालयातील आवश्यक कामासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी फक्त 4 कर्मचाऱ्यांची रजा मंजूर केली. व उर्वरित 6 कर्मचाऱ्यांची रजा नामंजूर केली. सक्षम प्राधिकाऱ्यांची ही कृती कोणत्या नियमानुसार योग्य वा अयोग्य आहे ?

(1) योग्य, म.ना.से. (रजा) नियम 1979 मधील नियम 10 व 12 नुसार

(2) अयोग्य, म.ना.से. (रजा) नियम 1979 मधील नियम 14 नुसार

(3) योग्य, म.ना.से. (रजा) नियम 1979 मधील नियम 18 नुसार

(4) अयोग्य, म.ना.से. (रजा) नियम 1979 मधील नियम 20 नुसार

---

**30.** ___________ रजेवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास कोणतेही रजावेतन मिळण्याचा हक्क असणार नाही.

(1) अर्धवेतनी (2) अर्जित (3) असाधारण (4) प्रसूती

---

**31.** म.ना.से. (___________) नियमानुसार निकडीच्या प्रकरणी राजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याला त्याची रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी रजेवर जाण्यास परवानगी देऊ शकेल. परंतु लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडुन रजेच्या अनुज्ञेयतेसंबंधीचा अहवाल मिळविण्यात येई पर्यंत त्याची रजा अंतिमतः मंजूर करता येणार नाही.

(1) म.ना.से. (वेतन) नियम

(2) म.ना.से. (रजा) नियम

(3) म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम

(4) म.ना.से. (वर्तणूक) नियम

---

**32.** निवृत्तीवेतन परिगणनेमध्ये ___________ समावेश होतो.

(1) अंशदानाचा (2) उपदानाचा

(3) महागाईवेतनाचा (4) मूळ वेतनाचा

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**33.** म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियमांच्या तरतुदीनुसार सेवेतून ______________ आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतन व उपदान मिळणार नाही.

(1) सक्तीने सेवानिवृत्त करण्यात (2) बडतर्फ करण्यात

(3) वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविण्यात (4) निलंबित करण्यात

---

**34.** म.ना.से. (शि. व अ.) नियम 1979 च्या नियम 5 मधील पोटनियम (1) च्या क्र. 1 ते 6 मध्ये __________ नमूद केल्या असून पोटनियम (1) च्या क्र. 7 ते 9 मध्ये ____________ नमूद केल्या आहेत.

(1) किरकोळ शिक्षा, जबर शिक्षा

(2) भ.नि.नि. अग्रिम, विमा योजना

(3) अर्जित रजा, किरकोळ रजा

(4) प्रवास भत्ता, वैद्यकीय खर्च

---

**35.** म.ना.से. (शिस्त व अपील) नियम 1979 मध्ये किरकोळ शिक्षा नमूद आहेत. शासकीय कर्मचाऱ्यावरील गैरवर्तनाच्या दोषारोपांच्या अनुषंगाने त्याने केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्याची वेतनवाढ 3 वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी रोखून ठेवण्याचे प्रस्तावित केले असेल तर शासकीय कर्मचाऱ्याला अशी कोणतीही शिक्षा देण्याचा आदेश देण्यापूर्वी ____________ .

(1) प्रस्तावित शिक्षेबाबत शासकीय कर्मचाऱ्याचे अभिवेदन मागवावे

(2) म.ना.से. (शि. व अ.) नियम 1979 मधील जबर शिक्षेसाठी निर्धारित केलेल्या पद्धतीनुसार चौकशी करण्यात येईल

(3) सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घ्यावी

(4) वरील 1 ते 3 पर्यायांपैकी कोणतेहि नाही

---

**36.** गट 'क' च्या मान्यताप्राप्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेतर) संघटने द्वारे आपले पदाधिकारी म्हणून ________ ची नियुक्ती करता येईल.

(1) खाजगी व्यक्तीची

(2) सदस्येतर शासकीय अधिकाऱ्याची

(3) सदस्याची

(4) सेवानिवृत्त व्यक्तीची

---

**37.** श्री 'ख' ह्या शासकीय कर्मचाऱ्याने विधानसभेच्या निवडणुकीत त्याच्या वाहनावर राजकीय पक्षाचे निवडणूक चिन्ह लावले. श्री 'ख' यांची ही कृती योग्य वा अयोग्य ? आणि म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील कोणत्या नियमान्वये ?

(1) योग्य – नियम 6 (2) अयोग्य – नियम 12

(3) अयोग्य – नियम 5 (4) योग्य – नियम 4

---

**38.** म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील तरतुदीनुसार प्रत्येक शासकीय कर्मचारी, त्याची कोणत्याही सेवेत किंवा पदावर प्रथम नियुक्ती झाल्यानंतर आणि तदनंतर प्रत्येक वर्षी, शासनाने विहीत केलेल्या नमुन्यातील त्याच्या मत्तेचे व दायित्वाचे विवरणपत्र सादर करील. यामध्ये कोणकोणत्या गोष्टीसंबंधीचा संपूर्ण तपशील असावा ?

(1) त्याच्यावर अवलंबून नसणाऱ्या भावाने संपादित केलेली स्थावर व जंगम मालमत्ता

(2) मित्रमंडळींची स्थावर व जंगम मालमत्ता

(3) शासकीय कर्मचाऱ्यास वारस म्हणून प्राप्त झालेली, त्याने स्वतःच्या नावाने किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबियांच्या नावाने धारण केलेली, संपादित केलेली स्थावर मालमत्ता, बँक ठेवी, शेअर्स, ऋणपत्रे, रोख रक्कम, काढलेली कर्जे व इतर दायित्वे

(4) वरीलपैकी एकही नाही

---

**39.** एखाद्या वित्तीय वर्षाच्या काही भागाकरताच विधानमंडळात वार्षिक अर्थसंकल्प मंजूर करण्यासंबंधात घालून दिलेली कार्यपद्धती न अनुसरता, राज्याच्या एकत्रित निधीतून काही रक्कम काढून अपेक्षित खर्चाकरिता '___________' मंजूर करण्याची विनंती विधानमंडळस केली जाते.

(1) पुरवणी मागणी (2) लेखानुदान

(3) आकस्मिकता निधि (4) अतिरिक्त अनुदान

---

**40.** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ___________ मधील तरतुदीनुसार प्रत्येक वर्षासाठी राज्याचे उत्पन्न व अंदाजित खर्च याचे एक विवरणपत्र तयार करून राज्यपालाच्यावतीने राज्याच्या विधानमंडळाच्या दोन्ही सदनापुढे सादर केले जाते.

(1) 198 (2) 202 (3) 204 (4) 197

---

**41.** राज्य विधानमंडळाला कायद्याद्वारे अग्रधनाच्या स्वरूपात "_______________" या नावाचा निधि स्थापन करता येतो आणि अनपेक्षित खर्च भागविण्यासाठी, अनुच्छेद 205 किंवा 206 खाली राज्य विधानमंडळाकडून कायद्याद्वारे असा खर्च प्राधिकृत होई तोवर अशा निधितून अग्रिम देणे राज्यपालांस शक्य व्हावे याकरता उक्त निधी त्यांच्या दिमतीत रहातो.

(1) राज्याचा एकत्रित निधी (2) राज्याचा महसुळी निधी

(3) राज्याचा मांडवली निधी (4) राज्याचा आकस्मिकता निधी

---

**42.** महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली 1982 मधील नियम 4 नुसार कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा यामधील शासकीय कर्मचाऱ्याची ज्येष्ठता सामान्यपणे त्यांच्या त्या पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील ___________ सेवाकालावरून निश्चित करण्यात येईल.

(1) खंडित (2) अभावित (3) अखंडित (4) प्रतिनियुक्ती

---

**43.** ज्या शासकीय कर्मचाऱ्याचे नाव निवडसूचीत समाविष्ट केलेले आहे त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही चालू असल्यामुळे त्यास निवडसूचीतील त्याच्या क्रमाप्रमाणे प्रत्यक्षात पदोन्नती दिलेली नसेल, आणि अशी शिस्तभंग कार्यवाही संपल्यानंतर त्याची पदोन्नती झाली असेल तेथे त्या प्रकरणाची परिस्थिती आणि शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा निर्णय लक्षात घेवून सक्षम प्राधिकारी ___________ . (वाक्य पूर्ण करा)

(1) त्या कर्मचाऱ्यास निवडसूचीतील त्याच्या क्रमानुरूप नव्हे तर अन्यथा निर्धारित केलेली नेमणुकीची मानीव तारीख नेमून देऊ शकेल

(2) निवडसूचीतील त्याच्या क्रमानुसार नेमणुकीची तारीख देईल

(3) त्याच्या प्रत्यक्षात पदोन्नतीपासून नेमणुकीची तारीख देईल

(4) त्याच्या वयानुसार नेमणुकीची तारीख देईल

---

**44.** आदर्श टिप्पणी लेखनाच्या संकेतानुसार उपस्थित प्रश्नांबाबत कार्यालयातील/विभागांतर्गत मूळ कार्यासनासह इतर कार्यासनांचा संबंध असल्यास, मूळ कार्यासनाने संबंधिताशी ____________ शक्यतो संयुक्त टिप्पणी लिहावी.

(1) माहिती मागवून (2) फाईल पाठवून
(3) प्रारूप सादर करून (4) चर्चा करून

---

**45.** शासन पत्रव्यवहार करताना कोणतीही गोष्ट सरळ सांगावी, ____________ लिहू नये.

(1) काळजीपूर्वक (2) सर्वपरिचित
(3) आडवळणाने (4) कालानुक्रमे

---

**46.** 'मान्यतेकरिता मसुदा' हे शब्द असलेली चिठ्ठी ____________ जोडण्यात यावी.

(1) मसुद्याला (2) टिप्पणी विभागात
(3) नस्तीला (4) नस्तीसोवतच्या संदर्भाला

---

**47.** शासन सेवेत सरळसेवा प्रवेशासाठी दि. 29 मार्च 1997 च्या शा. निर्णयान्वये सामाजिक आरक्षणाच्या 100 बिंदु नामावलीत अनुसूचित जातीसाठी ____________ टक्के आरक्षण तर अनुसूचित जमातीसाठी ____________ टक्के आरक्षण आहे.

(1) 52%, 48% (2) 48%; 52%
(3) 13%, 7% (4) 19%, 7%

---

**48.** शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्या संदर्भातील अधिनियमाच्या तरतुदीनुसार अखिल भारतीय सेवेतील अधिकारी, आणि अ, ब व क गटातील राज्य शासनाचे सर्व सेवक यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी ____________ असेल.

(1) 2 वर्षे (2) 3 वर्षे (3) 4 वर्षे (4) 5 वर्षे

---

**49.** न्यायाधिकरणाने दिलेल्या ज्या आदेशाचे पुनर्विलोकन अपेक्षित आहे त्या आदेशाची प्रत मिळाल्यापासून ____________ दिवसांच्या आत न केलेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

(1) पंधरा (2) वीस
(3) तीस (4) पंचेचाळीस

---

**50.** सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करावयाचे झाल्यास उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाविरुद्ध अपील करण्याजोगे आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय देण्याची विनती ____________ यांना करण्यात येते.

(1) वित्त विभागाला
(2) संबंधित सरकारी वकीलांना
(3) सामान्य प्रशासन विभागाला
(4) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला

---

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

### नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्रीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**